# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि.ठाणे-40110
दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985


## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

दि. 01 / 10 /2024

जा.क्र./मनपा/पा.पु./कार्या/ 05 /2024-25

## // कार्यादेश //

प्रति,
मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी
सी/5, बॉम्बे मार्केट,
स्टेशन रोड, भाईंदर (प.)

विषय :- पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती व वितरण व्यवस्था सुरळीत ठेवणेसाठी जेसीबी मशीन पुरवठा करणे.

संदर्भ :- 1) मा. आयुक्त सो. यांची दि.23/12/2023 रोजीची आर्थिक व प्रशासकिय मान्यता
2) फेर-निविदा सुचना क्र.44 (2023-24) दि.27/02/2024
3) मा. आयुक्त यांची दि.13/07/2024 रोजीची निविदा मंजूरी
4) प्रशासकिय ठराव क्र.43 दि.18/07/2024 अन्वये निविदा मंजूरी
5) जा.क्र.मनपा/पा.पु. व मलनि/779/2024-25 दि.23/07/2024 अन्वये स्वीकृतीपत्र
6) सुरक्षा अनामत रक्कम रु.45,540/- टर्म डिपॉझिट पावती नं.1890674 दि.25/07/2024
7) दि.31/07/2024 रोजीचा करारनामा

वरील संदर्भिय विषयानुसार कळविण्यात येते की, **पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती व वितरण व्यवस्था सुरळीत ठेवणेसाठी जेसीबी मशीन पुरवठा करणे. (अंदाजित रक्कम रु.15,17,775/-)** (Tender Id No. 2024_MBMC_1019449_1) हे काम **रु.1239/- (प्रति तास)** या दराने मंजूर करण्यात येते आहे. सबब उपरोक्त काम सुरु करणेस या पत्राव्दारे कार्यादेश देण्यात येत आहे. या कामाची मुदत कार्यादेशाच्या दिनांकापासून 12 महिन्यांची राहील.

**अटीशर्थी :-**

1. सदरचे काम आदेश प्राप्त झाल्यापासून 3 दिवसाच्या आत संबंधित कनिष्ठ अभियंता/उप अभियंता यांच्या नियंत्रण व देखरेखेखाली सदर काम सुरु करण्यात यावे. तथा कामाचा फलक लावण्यात यावा.
2. सदरचे काम त्रयस्थ लेखापरिक्षण कक्षेत असल्यास त्रयस्थ लेखापरिक्षणाचे अहवाल अद्यावत ठेवण्यात यावे.

कार्यकारी अभियंता (पा.पु. व मलनि:)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रत : कार्यवाहीसाठी
श्री. मनोज विशे - कनिष्ठ अभियंता

1. सदर काम हे निविदा मधील अटीशर्ती, स्पेसिफिकेशन, मापदंडानुसार, शासन, महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी देण्यात आलेले आदेश व आवश्यक परवानग्या घेऊन विहीत कार्यपध्दत अवलंबुन व अभिलेखाचे जतन करुन कंत्राटदाराकडून मुदतीत काम करुन घेण्याची जबाबदारी व्यक्तीश: आपली राहील.
2. सदर आदेशानुसार कामाबाबतची माहिती विहीत नमुन्यात भरुन वेळोवेळी अद्यावत ठेवण्यात यावी. तसेच कामाची दैनंदिन माहिती व प्रगती केल्यावर तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावी.
3. सदर कार्यादेशाची माहिती वॉर्ड मधील संबंधित नगरसेवकांना तात्काळ कळविण्याची दक्षता घेण्यात यावी.
4. सदर काम त्रयस्थ लेखापरिक्षणाच्या कक्षेत असल्यास त्रयस्थ लेखापरिक्षण करुन घेण्यात यावे. कामात वापरण्यात आलेल्या साहित्याची वेळोवेळी सक्षम यंत्रणेकडून समक्ष तपासणी करुन अहवाल संचिकेत अद्यावत ठेवण्यात यावे.

कार्यकारी अभियंता (पा.पु. व मलनि:)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner